(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / VOL. XII / Issue- II ISSN 2277-8063

# 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाचे आर्थिक परिणाम

**अश्विनी विपुल पाटील** सहाय्यक प्राध्यापक- वाणिज्य विभाग कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज

**शुभांगी वसंतराव ठोंबरे** सहाय्यक प्राध्यापक-वाणिज्य विभाग कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज

---

## प्रास्ताविक

शेकडो वर्षाच्या पारतंत्र्यानंतर भारताने समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून आपली वाटचाल सुरू केली. अमेरिका व पाश्चात्त्य देशांशी चांगले संबंध प्रस्थापित न झाल्याने भारताला व्यापारासाठी सोवियत रशियावर अवलंबून राहावं लागले. 1980 नंतर सोवियत दुभंगण्याची प्रक्रिया सुरू झाली ,आणि 1991 मध्ये पंधरा देशात विभाजन झाले. याचा परिणाम भारताच्या निर्यातीवर झाला व भारतीय व्यापार संकटात आला. याच दरम्यान अमेरिकेने 1991 मध्ये इराकविरुद्ध युद्ध पुकारले. या युद्धाचा परिणाम म्हणजे जगातील तेल साठ्यातील पुरवठ्यावर झाला. त्यावेळी कच्च्या तेलाच्या आयातीसाठी भारताला मोठी किंमत मोजावी लागली. परिणामी परकीय गंगाजळी कमी राजकीय परिस्थिती सुद्धा अस्थिर झाले. गुंतवणूकदारांचा विश्वास कमी झाला आणि देशात विदेशी गुंतवणूक येणे कमी झाले.

भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक संकटात सापडली होती. विदेशी चलन साठा खूपच कमी झाला होता. चलनवाढ प्रचंड प्रमाणात वाढली होती. संरक्षण
व्यवस्था, अनुदान, कर्जावरचे व्याज इत्यादी वरचा सरकारचा खर्च महसुलापेक्षा जास्त वाढला होता. यातून बाहेर पडण्यासाठी सरकारला कर्ज घेणे भाग पडू लागले. 1990- 91 मध्ये ही कर्जाचे प्रमाण 53% पर्यंत पोहोचले. विदेशी कर्ज 70 अब्ज डॉलर्स पर्यंत पोहोचले. 290 अब्ज डॉलर्स जीडीपी असणाऱ्या भारताला 70 अब्ज डॉलर्स कर्ज हा एक मोठा बोजा होता. याच दरम्यान 3 जुलै 1991 मध्ये रुपयाचे दोन टप्प्यांमध्ये अवमूल्यन करण्यात आले.

आजच्या तरुण पिढीला हे वाचून कदाचित आश्चर्य वाटेल की, 1991 पूर्वी स्कूटर म्हणजे बजाज , बूट म्हणजे बाटा , चार चाकी गाडी म्हणजे प्रीमियर पद्मिनी, दूध म्हणजे सरकारी योजनेच्या काचेच्या बाटलीत विविध रंगीत बुचाचे झाकण असलेले, बँका म्हणजे सरकारी किंवा सहकारी बँका, विमा म्हणजे एलआयसी, विमान सेवा म्हणजे एअर इंडिया, टीव्ही म्हणजे दूरदर्शन, रेडिओ म्हणजे ऑल इंडिया रेडिओ म्हणजे आकाशवाणी या गोष्टींना कोणताच पर्याय उपलब्ध नव्हता.

## विषयाची निवड

30 वर्षांपूर्वी 24 जुलै 1991 मध्ये उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या त्रिसूत्रीचा देशाच्या विकासासाठी अवलंब करण्यात आला. या घटकांच्या आधारे देशाचा झालेला विकास अभ्यासण्यासाठी, आर्थिक विकासातील योगदान समजून घेण्यासाठी ,देशाच्या शेती, उद्योग व सेवा क्षेत्रामध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास करण्यासाठी व तसेच त्यांचे फायदे तोटे यांचा आढावा घेण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंध विषयाची निवड करण्यात आली आहे.

## 1991 च्या आर्थिक धोरणाची उद्दिष्टे

1) भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण करणे,
2) अर्थव्यवस्थेत स्थैर्य प्राप्त करून देणे व व्यवस्थेत संरचनात्मक बदल घडवून आणणे.
3) आंतरराष्ट्रीय व्यवहार तोल सांभाळणे.
4) विदेशी चलन साठा वाढवणे.
5) चलनवाढीचा दर कमी करणे.
6) उच्च आर्थिक वृद्धीदर प्राप्त करणे.

**1991 च्या आर्थिक धोरणाची गरज**

भारताच्या आर्थिक इतिहासात 1991 हे वर्ष सर्वात जास्त आव्हानात्मक राहिले देशाची अर्थव्यवस्था मोठ्या आणि गंभीर संघटने ग्रासली होती. भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक संकटातून जात होती. विदेशी चलन साठा फक्त दोन आठवडे पर्यंत आयात करता येईल एवढाच कमी प्रमाणात शिल्लक होता. अशा परिस्थितीत समाजवादी समाजव्यवस्थेचे समाजावरील परिणाम कमी होत होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत नवीन बदल करणे गरजेचे होते. म्हणून 24 जुलै 1991 मध्ये नव्या आर्थिक धोरणाची संसदेमध्ये घोषणा करण्यात आली. तत्कालीन अर्थमंत्री डॉ मनमोहन सिंग यांनी अर्थसंकल्प सादर करताना नव्या धोरणाची रुपरेषा ही मांडली. 1991 च्या आर्थिक धोरणातील बदलाची प्राथमिक पावले 1980 - 81 ते 1984 - 85 या सहाव्या पंचवार्षिक योजना काळात पडली, या नवीन आर्थिक धोरणानुसार उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या तीन संकल्पनांचा स्वीकार करण्यात आला.

**1991 च्या आर्थिक धोरणाचे घटक**

**1) उदारीकरण**

सरकारने अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावर टाकलेली बंधने कमी करणे किंवा शिथिल करणे म्हणजे उदारीकरण होय.

उदारीकरणाद्वारे बाजारशक्तीच्या सहाय्याने अर्थव्यवस्था अधिक प्रभावी बनेल असा विश्वास इतर देशांनी लेल्या उदारीकरणाद्वारे सिद्ध झाला होता, म्हणून भारताने 1991 च्या धोरणात उदारीकरण या संकल्पनेचा स्वीकार केला.

**उदारीकरणाची उद्दिष्टे**

1) औद्योगिक उत्पादनाची अंतर्गत स्पर्धा शक्ति वाढवणे
2) परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञानाला आकर्षित करणे
3) देशावरील कर्जाचे प्रमाण कमी करणे.
4) देशातील सार्वजनिक क्षेत्राची भूमिका कमी करणे विकसित देशांना व्यापाराची संधी प्राप्त करून देणे.

**उदारीकरणाची वैशिष्ट्ये**

1.उदारीकरण अंतर्गत व्यापारी बँकांना बाजारातील मागणी व पुरवठ्यानुसार व्याजदर निश्चितीचे स्वातंत्र्य देण्यात आले.
2.उदारीकरणाच्या काळात उद्योगांना उत्पादनाबाबतचे मुक्त निर्णय घेण्याची स्वातंत्र्य देण्यात आले.
3.उदारीकरणामुळे ज्या संस्थांवर गुंतवणुकीचे निर्बंध लादले होते त्यांना मुक्त निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.
4.उदारीकरणामुळे परकीय चलनावरील नियंत्रणे कमी झाल्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराला प्रोत्साहन मिळाले.
5) उदारीकरणामुळे प्राधान्यक्रम असणाऱ्या उद्योगात विदेशी तंत्रज्ञानाला परवानगी देण्यात आली.

**2) खाजगीकरण**

खाजगीकरण ही एक व्यापक संकल्पना आहे. मालकी हक्क बदलून किंवा मालकी हक्क न बदलता खाजगी व्यवस्थापनाला परवानगी देणे, सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग कमी करणे व खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवणे म्हणजे खाजगीकरण होय.

**खाजगीकरणाची कारणे**

1) सार्वजनिक उपक्रमांचा संचित तोटा दरवर्षी वाढत होता त्यातून मार्ग काढण्यासाठी अशा उद्योगांचे खाजगीकरण करण्यात आले.
2) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांपासून होणाऱ्या बचतीचे प्रमाण घटत चालले होते म्हणून असे उद्योग खाजगी क्षेत्रात हस्तांतरित केले .

3) देशातील सार्वजनिक उद्योगात उत्पादन क्षमतेचा पुरेपूर उपयोग होत नव्हता त्यामुळे त्याचा देशाच्या उत्पादनावर परिणाम होत होता. त्यामुळे त्यांचे खाजगीकरण करण्यात आले.

4) सार्वजनिक क्षेत्रातील नोकर भरती अतिरिक्त प्रमाणात होत होती तसेच संसाधनांचा अपय होत होता. मानवी संसाधनांचा गैरवापर केल्यामुळे त्यांची कार्यक्षमता घटत चालली होती म्हणून खाजगीकरण गरजेचे होते.

**फायदे**

1. खाजगीकरणामुळे सार्वजनिक क्षेत्रांतील उपक्रमांना त्यांच्या खऱ्या उत्पादन क्षमतेची जाणीव झाली.

2) खाजगी क्षेत्रांतर्गत उद्योगांची कार्यक्षमता सुधारली, नफा वाढला.

3) खाजगीकरणामुळे उद्योग - उपक्रम अनावश्यके सरकारी नियंत्रणापासून मुक्त झाले व त्यांच्यातील पारदर्शकता वाढीस लागली

**तोटे**

1) खाजगीकरणामुळे सरकारला नियमित मिळणारे उत्पन्न कमी होऊ लागले.

2) खाजगीकरणामुळे समाज कल्याणाकडे दुर्लक्ष होऊ लागले.

3) खाजगीकरणामुळे संपत्तीचे केंद्रीकरण होऊन आर्थिक विषमता वाढीस लागली.

4) खाजगीकरणामुळे सरकारवर खाजगी उद्योजकांचा प्रभाव वाढत गेला.

**3) जागतिकीकरण**

विविध देशांमध्ये माहिती तंत्रज्ञान, भांडवल, लोक, बाजारपेठ, वस्तू यांचा मुक्त संचार व देवाण-घेवाण म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरण म्हणजे एका देशातील व्यक्तीला दुसऱ्या देशात व्यापार, दळणवळण, उद्योगधंदे करण्यासाठी मुक्त परवानगी देणे होय.

जागतिकीकरणामुळे देशोदेशीच्या अर्थव्यवस्था व बाजारपेठा एकमेकांशी जोडल्या गेल्या.1990 नंतरच्या काळात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला. लोकांमधील संपर्क व देवाण-घेवाण वाढत गेली. भांडवल, कुशल व अकुशल मनुष्यबळ इत्यादींना जगभरात कोठेही ने-आण करणे शक्य झाले आणि वस्तूचे उत्पादन ज्या ठिकाणी घेता येणे शक्य आहे त्या ठिकाणी त्या त्या मनुष्यबळाचा वापर करणे जागतिकीकरणामुळे शक्य झाले. जागतिकीकरणांचा फक्त आर्थिक परिणाम न होता, राजकीय, सामाजिक ,सांस्कृतिक घटकावर ही परिणाम दिसून आला. जागतिकीकरणामुळे सर्व देशाच्या आर्थिक व परराष्ट्र धोरणात अमुलाग्र बदल घडून आले.

**जागतिकीकरणाचे उद्दिष्ट**

1) अर्थव्यवस्था मुक्त बनवणे आयातीवरील बंधने हळूहळू कमी करणे.

2) विदेशी गुंतवणुकीला मुक्त परवानगी देणे.

3) देशाच्या अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्थेची जोडणे.

**फायदे**

1) देशा- देशातील मुक्त व्यापाराला चालना मिळू लागली.

2) जागतिकीकरणामुळे देशात भांडवल गुंतवणुकीची मोठ्या प्रमाणात संधी निर्माण झाली.

3) जागतिकीकरणामुळे प्रसार माध्यमाच्या सहाय्याने जगाला एकत्र आणणे शक्य झाले.

4) जागतिकीकरणामुळे जागतिक पातळीवरील ज्ञान माहिती संस्कृती यांची मोठ्या प्रमाणावर आदान-प्रदान होऊ लागली.

5) जागतिकीकरणामुळे तंत्रज्ञानाचा वापर वाढवून उत्पादनाची क्षमता वाढली.

6) जागतिकीकरणामुळे देशा - देशातील सामंजस्य व सद्भावना वाढीस लागली आणि जग एक उत्तम बाजारपेठ बनले.

**तोटे**

1. जागतिकीकरणाचा फायदा फक्त मोठ्या उद्योगपतींना होऊ लागला व सर्वसामान्यांना महागाई तोंड द्यावे लागले.

2) खाजगीकरण ,उदारीकरण व जागतिकीकरणामुळे बेकारीचे प्रमाण वाढू लागले .

3) जागतिकीकरणामुळे आयातीवरील कर रद्द झाल्यामुळे राष्ट्राच्या उत्पन्नात घट होऊ लागली .

4) जागतिकीकरणामुळे अनियंत्रित स्पर्धा वाढवून स्थानिक लहान उद्योगांचे हानी होऊ लागली.

5) जागतिकीकरणामुळे जगात श्रीमंत व गरीब देश अशी विषमतानिर्माण होऊ लागली.

**सारांश**

अशाप्रकारे 1991 च्या आर्थिक धोरणानुसार उदारीकरण खाजगीकरण व जागतिकीकरण या त्रिसूत्रीचा अवलंब करण्यात आला आणि देशाच्या विकासामध्ये हातभार लागला. या घटकांच्या आधारे प्रत्येक राष्ट्राची आणि राष्ट्रातील उद्योगांची स्पर्धा वाढीस लागली.

जगात चालणाऱ्या संशोधन व विकासाचा लाभ सर्वच राष्ट्रांना त्वरित मिळू लागला त्यामुळे प्रत्येक राष्ट्रातील कार्यक्षमता आणि उत्पादकता यामध्ये जलदवाढ होऊ लागले. शासकीय गुंतवणूक कमी करून नव्या धोरणांमध्ये खाजगीकरणाला प्राधान्य देण्यासाठी आणि जागतिकीकरण साध्य करण्यासाठी उदारीकरणाची दिशा देणे अशा प्रकारे 1991 चे धोरण हे विकासाला एक नवी दिशा देणारे असे ठरले.

**संदर्भ ग्रंथ**

- 1991 चे नवे आर्थिक धोरण - महाराष्ट्र टाइम्स
- पुढारी न्युज – ई- पेपर - 2021
- भारतीय अर्थव्यवस्था - रंजन कोळंबे भारतीय
- अर्थव्यवस्था- विकिपीडिया